भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र.५९३/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २३/०८/२०१७

**१) गैरकायदयाची मंडळी जमवुन चाकुने व हाताबुक्यांनी मारहान करुन जिवानीशी ठार केल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक २१/०८/२०१७ चे २३.०० वा. दर. यातील आरोपीतांनी गैरकायदयाची मंडळी जमवुन मृतक — रोहीत दिपक सांडेकर वय २४ वर्ष, रा. रविदास वार्ड तुमसर याचा मित्र योगेश गायधने याच्याशी आरोपी क्र. १ हा बोलत असतांना मृतक रोहीत हा मध्ये का बोलला या कारणावरुन वाद करुन आरोपी क्र. १ ने चाकुने व आरोपी क्र. २,३,४,५ यांनी हाताबुक्यांनी मारहान करुन रोहीत सांडेकर यास जिवानीशी ठार केल्याने फिर्यादी मंगेश यादवराव थुल वय २८ वर्ष, रा. मोठा बाजार तुमसर यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३०२,१४३,१४७,१४९ भादंवि. सहकलम १३५ मपोका सहकलम ३(२)(५),३(२)(व्ही.ए)अ.जा.ज.अ.प्र.का सुधारीत अधीनियम २०१५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. उपविभागीय पोलीस अधीकारी तुमसर श्री. विक्रम साळी हे करीत आहेत.

**२) मोटार पंपची चोरी :—**

दिनांक २०/०८/२०१७ चे १८.०० ते २२/०८/२०१७ ०६.०० वा. दर. यातील फिर्यादी ताराचंद साधु वाढवे वय ५२ वर्ष, रा. देवनारा याचे राहते घराचे वाळीमध्ये विहीरी जवळ असलेल्या पाण्याचे टाकीला लावण्यात आलेली १ एचपी सेमी कंपनीची ईलेक्ट्रीक मोटार पंप किंमती ४५००/—रु ची कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन चोरुन नेल्याने फिर्यादी याचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. लिल्हारे पो.स्टे. गोबरवाही हे करीत आहेत.

**३) महेन्द्रा बोलेरो पिकअप गाडी हयगयीने चालवुन एकाचे मरणास व एकास जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक २१/०८/२०१७ चे २३.१५ वा. दर यातील मृतक आपले हिरो होंडा स्प्लेन्डर मोटार सायकल क्र. एमएच ३१ एके ९४०२ चा चालक राहुल भिमराव कनोजे वय २४ वर्ष, रा. आझाद नगर गांधी चौक तुमसर याचेसह फिर्यादी हे मागे बसुन नागपुर कडुन तुमसर कडे जात असता विरुध्द दिशेने येणाऱ्या आरोपी चालकाने आपले ताब्यातील महेन्द्रा बोलेरो पिकअप गाडी ही निष्काळजीपणे हयगयीने चालवुन मोटार सायकला धडक मारुन चालक राहुल कनोजे याचे मरणास कारणीभुत झाल्याने फिर्यादी विजय बिसनलाल यादव वय ३० वर्ष, रा. राजु नगर हिंगणा रोड नागपुर यांचे बयान व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे कलम २७९,३३७,३०४(अ) भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. राऊत पो.स्टे. वरठी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**४) संगनमत करुन काठीने व लोखंडी वस्तुने छातीच्या खाली डावे बाजुस मारुन जखमी केले :—**

दिनांक २१/०८/२०१७ चे ०६.०० वा. दर. यातील अनोळखी आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादी सोबत असलेल्या ईतर ३ ईसमांना तुम्ही डव्वा येथुन आमगाव येथे दारु पिण्यास का आले असे बोलुन फिर्यादी सोबतचा नरेश मते यास थापड मारली तेव्हा फिर्यादीने आरोपीतांना थापड कशाला मारली असे हटकले असता यातील अनोळखी आरोपीतांनी फिर्यादीचे डोक्यावर काठीने मारुन तसेच कोणत्यातरी लोखंडी वस्तुने छातीच्या खाली डावे बाजुस मारुन जखमी केले तसेच फिर्यादीचे सोबत असलेले राधेश्याम निंबाते व नरेश मते यास कोणत्यातरी लोखंडी वस्तुने मारुन जखमी केल्याने फिर्यादी उध्दव मारोती शहारे रा. चितापुर (टोली)बयान व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ३२४,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. नवखरे पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

**५) महिलेस अश्लिल शब्दात शिविगाळ केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक २२/०८/२०१७ चे १२.०० वा. दर. यातील फिर्यादी ही पळसगाव येथील व्यसनमुक्ती व महात्मा गांधी तंटामुक्ती समितीची अध्यक्ष आहे. फिर्यादी ही शेतामधुन एकटीच घरी प्रभा वाढई हिचे घरासमोरून जात असतांना यातील आरोपीने आपली सायकल तिचे जवळ थांबवुन समितीचे स्त्रीयांना लज्जेस धोका पोहचेल अशा अश्लिल शब्दात शिवीगाळ केल्याने फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरून पोस्टे साकोली येथे कलम ५०९ भांदवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.पुढिल तपास पो.हवा चांदेवार हे करित आहेत

**६) अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन मारण्या पिटण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक २२/०८/२०१७ चे १८.०० वा. दर. यातील फिर्यादी नंदलाल निलकराम राहांगडाले वय ६१ वर्ष, रा. गोंदीटोला व आरोपी हे एकाच गावचे व एकाच धर्माचे असुन फिर्यादी हे गावचे सरपंच आहेत ते तान्हा पोळयाचे कार्यक्रमाकरीता गेले असता यातील आरोपी याने माझ्या घरा समोर नाली बनवुन दे तुला किती पैसे पाहीजेत असे बोलुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन जिवाने मारण्या पिटण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरून पोस्टे सिहोरा येथे कलम २९४,५०६ भांदवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मुंडले हे करित आहेत

**७) हद्यपार आदेशाचे उल्लघंन केल्याने मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक २२/०८/२०१७ चे २०.०० वा. दर. मा. कोर्ट विद्यमान श्रीमती शिल्पा कुमारी सोनाली उपविभागीय दंडाधीकारी तुमसर यांचे हद्यपार आदेश ०२/२०१७ कलम ५७ मपोका अन्वये नमुद गुन्हेगार यास भंडारा जिल्हयातुन २ वर्षा करीता तडीपार केले असुन त्याचे वास्तव्य नागपुर जिल्हात आहे तरी तो नमुद ठिकाणी हजर आहे की नाही त्याबाबत त्याचे नातेवाहीक संजय नगर लाखनी येथे असल्याने तो असल्यास चेक करुन कार्यवाही करावी या आदेशा वरुन आरोपीस चेक केले असता तो संजय नगर लाखनी येथील सुदर्शन अनंतराम मेश्राम यांचे घरी हजर मिळाला सदर हद्यपार आरोपीने मा. उपविभागीय दंडाधीकारी तुमसर यांचे हद्यपार आदेशाचे उल्लंघन केल्याने पोस्टे लाखनी येथे कलम १४२ भादवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. ऊईके हे करित आहेत. आरोपी अटक आहे.

**८) अवैध दारु/जुगार अडयावर धाडी . :—**

दिनांक २२/०८/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे भंडारा, जवाहरनगर, मोहाडी, कारधा, सिहोरा, गोबरवाही, साकोली, पालांदुर, पवनी, अडयाळ व लाखांदुर येथे दारू/ जुगार अडयावर धाडी घालुन एकुण १९ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ६६ लिटर हातभटटी दारु + साहित्य ५किंमती ४६२०/—रु. १०४ लिटर १६० मिली लिटर देशी / विदेशी + १ मोटार सायकल किंमती ५७२२२/—रु. तसेच व जुगारातुन किंमती ७७२०/—रु. असा एकुण किमती ६९,५६२/रु चा माल जप्त करण्यात आला आहे.

**९) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—**

दिनांक २२/०८/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण २२ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली अवैध प्रवासी ०१ असून तीन सिटर वाहनांवरती ०२ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती १९ केसेस करण्यात आलेल्या आहे.

23.8

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

पोलीस अधीक्षक कार्यालय भंडारा (म.रा.)

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.